अस्थायी शासकीय कर्मचा-यांना कायमपणाचे फायदे उपलब्ध करून देणे-
सक्षम प्राधिका-यांने द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना

---

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमाक :- स्थाप्रप-१०८५/५८६/प्र.क्र.५५/१३-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २८ ऑगस्ट, १९८५.

पहा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०७५/दहा, दिनांक १९.९.१९७५.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र .एसआरव्ही-१०७५/दहा, दिनांक ९.४.१९७६.

**परिपत्रक** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०७५/दहा, दिनांक १९.९.१९७५ या अनुसार कायमपणाचे फायदे मिळण्यास पात्र होणा-या प्रत्येक अस्थायी शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत त्या कर्मचा-याची नियुक्ती करण्यास सक्षम असणा-या अधिका-यांना तो कायमपणाचे फायदे मिळण्यास पात्र होत आहे, अशा आशयाचे प्रमाणपत्र येणे आवश्यक असते. अशी प्रमाणपत्रे देण्यात एकरूपता राखण्याच्या दृष्टीने ती शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७५/दहा, दिनांक ९ एप्रिल, १९७६ चे जोडपत्र "अ" मधील नमुन्यात नोंदवावेत असे आदेश देण्यात आले आहेत. परंतु अशी प्रमाणपत्रे विहित नमुन्यात आणि सक्षम प्राधिका-याच्या सहीने दिली जात नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, अशी प्रमाणपत्रे वेळच्यावेळी दिली जात नाहीत आणि दिल्या गेलेल्या प्रमाणपत्रांची नोंद संबंधित कर्मचा-याच्या सेवापुस्तकात घेतली जात नाही. त्यामुळे कायमपणाचे फायदे मिळण्यास पात्र असूनही केवळ तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात नोंदले न गेल्यामुळे कर्मचा-यांस सेवानिवृत्ती वेतनादि लाभ मिळण्यास अवाजवी अडचणी येतात. ही गोष्ट अतिशय गंभीर आहे.

२. पात्र अस्थायी शासकीय कर्मचा-यांना कायमपणाचे फायदे देण्याची प्रमाणपत्रे वेळीच देण्याची आणि त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्याची दक्षता नियुक्ती प्राधिका-यांनी घ्यावी. नियुक्ती प्राधिका-यांना प्रमाणपत्र देणे सोयीचे व्हावे म्हणून प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडण्यात आला आहे. कायमपणाच्या फायद्याची प्रमाणपत्रे योग्य त्या सक्षम प्राधिका-याच्या सहीने आणि हया नमुन्यातच देण्यात येतील याची दक्षता घ्यावी.

३. त्याचप्रमाणे शासन असेही आदेश देत आहे की, जे अस्थायी शासकीय कर्मचारी दिनांक ३१ डिसेंबर, १९८१ पूर्वी सेवत आले आहेत आणि ज्यांनी आपल्या अखंड सेवेची ३ वर्षे पूर्ण केली आहेत अशा अस्थायी शासकीय कर्मचा-यांना, जर ते विहित अटींची पूर्तता करीत असतील तर कायमपणाच्या फायद्याची प्रमाणपत्रे देण्याचे काम कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ ऑक्टोंबर, १९८५ पूर्वी पूर्ण करण्यात यावे. त्याबाबतचा प्रतीपूर्ती अहवाल सोबत जोडलेल्या नमुन्यात संबंधित नियुक्ती प्राधिका-यांनी/विभाग प्रमुखांनी आपापल्या प्रशासकीय मंत्रालयीन विभागाकडे दि. ३० नोव्हेंबर, १९९५ पूर्वी न चुकता पाठवावा. मंत्रालयीन विभागांनी आपल्या विभागाचा व आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या सर्व कार्यालयांबाबतचा एकत्रित अहवाल हया विभागाकडे दि. ३१ डिसेंबर, १९८५ पूर्वी न चुकता पाठवावा.

४. शासन असेही आदेश देत आहे की, अस्थायी शासकीय कर्मचा-यांना कायमपणाच्या फायदयाची प्रमाणपत्रे देण्याचे काम नियुक्ती प्राधिका-यांनी प्रत्येक वर्षात ३१ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करावे व त्याबाबतचा अहवाल ३० सप्टेंबर पर्यंत विभाग प्रमुखांकडे पाठवावा. नियुक्ती प्राधिका-यांकडून अहवालाव्दारे आलेली माहिती एकत्रित करून ती विभाग प्रमुखानी ३१ ऑक्टोबर पर्यंत आपल्या संबंधित मंत्रालयीन

प्रशासकीय विभागाकडे पाठवावी. मंत्रालयीन विभागांनी हे अहवाल त्यांचेकडे वेळेवर पोचतील व माहितीच्या आधारे सर्व पात्र अस्थायी शासकीय कर्मचा-यांना कायमपणाच्या फायदयाची प्रमाणपत्रे वेळेवर मिळतील हयाकडे सतत काळजीपूर्वक लक्ष पुरवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पा. वा. नायक
शासनाचे सचिव (सेवा)

सहपत्रे- १. प्रमाणपत्राचा नमुना.
२. अहवालाचा नमुना.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१,महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२,महाराष्ट्र, नागपूर,
* सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय,
* सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,मुळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, मुंबई,
सदस्य सचिव, सर्व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती,
* पत्राने.

दिनांक ३१ डिसेंबर, १९८१ पूर्वी शासकीय सेवेत आलेल्या शासकीय कर्मचा-यांना कायमपणाच्या फायद्याची प्रमाणपत्रे देण्याबाबत अहवाल.

विभाग/कार्यालयाचे नाव :-

| अनु. क्रमांक | संवर्गाचे नाव | संवर्गातील अस्थायी शासकीय कर्मचा-यांची एकूण संख्या | तीन वर्षांचा अखंड सेवाकालावधी पूर्ण झालेल्या व विहित अटींची पूर्तता केल्यामुळे कायमपणाच्या फायद्याची प्रमाणपत्रे मिळण्यास दिनांक ३१ डिसेंबर १९८४ रोजी पात्र ठरलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-यांची संख्या | कायमपणाच्या फायद्याची प्रमाणपत्रे देण्यात आलेल्या शासकीय कर्मचा-यांची संख्या | कायमपणाच्या फायद्याची प्रमाणपत्रे देण्यात आलेल्या शासकीय कर्मचा-यांची संख्या | अभिप्राय (अभिप्राय देताना कायमपणाच्या फायद्याची प्रमाणपत्रे न देण्याची कारणे नमुद करावीत आणि प्रमाणपत्रे कधी देण्यात येतील तेही नमुद करावे.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |

स्थळ :-

सक्षम अधिका-याची सही व पदनाम

दिनांक :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०७५/दहा,
दिनांक १९ सप्टेंबर, १९७५ याच्या परिच्छेद ३ अनुसार प्रमाणपत्र.

----

## प्रमाणपत्र

यान्दारे प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०७५/दहा, दिनांक १९ सप्टेंबर, १९७५ यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती पुढील विवरणपत्रात नमुद करण्यात आलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-याच्याबाबतीत पूर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार ते कर्मचारी, सर्व प्रयोजनार्थ त्या विवरणपत्रात त्यांच्या नावासमोर स्तंभ २ मध्ये नमुद केलेल्या पदांवरील स्थायी शासकीय कर्मचारी म्हणून समजले जाण्यास पात्र आहेत.

| स्थायी शासकीय कर्मचा-याचे नाव व त्याचे सध्याचे पदनाम<br>१. | त्यांना थेट भरती करून प्रारंभी ज्या पदावर नेमण्यात आले होते ते पद.<br>२. |
|---|---|
| | |

दिनांक :-

सक्षम प्राधिका-याची सही व पदनाम

कार्यालयाचे नाव व पत्ता :